# युनिट-4

## भ्रष्टाचार
(Corruption)

(अ) भ्रष्टाचार : अर्थ व्याख्या आणि प्रकार
(ब) भ्रष्टाचाराचे कारक आणि दुष्परिणाम
(क) भ्रष्टाचार थांबविण्याचे उपाय

भ्रष्टाचार हा समाज संरचनेत भिनलेला रोग आहे. गल्लीपासून दिल्लीपर्यंत भ्रष्टाचार समाजमनात भिनलेला आढळतो. पैसाच सर्वकाही या प्रवृत्तीमुळे देशात भ्रष्टाचार वाढतांना आढळतो. त्यामुळे भ्रष्टाचार हा एक सामाजिक प्रश्न बनल्याचे आढळते. भ्रष्टाचार ही आजची समस्या नसून ती ऐतिहासिक काळापासून अस्तित्वात आहे. एवढे मात्र सत्य आहे की, अलिकडील काळात भ्रष्टाचार विकराल रूप धारण करीत आहे. भ्रष्टाचाराची व्यापकता वाढत आहे. त्यामुळे समाजातील सामान्य वर्गाला त्याची झळ पोहचत आहे. देशातील सर्वच क्षेत्रे भ्रष्टाचाराने किडलेली आढळतात. स्वार्थवाद भौतिक सुखाची लालसा, नैतिकतेचे अधपतन. यामुळे मानवी जीवनातील प्रत्येक पैलूंमध्ये भ्रष्टाचार दिसून येतो. भ्रष्टाचारात राजकारण्यापासून अधिकारी, पोलीस यंत्रणा, उद्योगपती व व्यापाऱ्यापर्यंत सर्वच लोक व्यक्तीगत किंवा सामुहिकरित्या भ्रष्टाचारात गुंतल्यामुळे भ्रष्टाचाराची एक गंभीर सामाजिक समस्या बनलेली दिसते. म्हणून प्रस्तुत सामाजिक समस्येचे अध्ययन करणे क्रमप्राप्त ठरते. कारण भ्रष्टाचाराच्या जटिल समस्येने इतर समस्यांना जन्म दिल्याचे आढळते. त्यामुळे भ्रष्टाचाराचें अध्ययन करतांना भ्रष्टाचार कसा कमी करता येईल याचा सुद्धा विचार करणे गरजेचे आहे.

भ्रष्ट आचरण हाच गुन्हा समजल्या गेल्यामुळे सामाजिक व्यवहार कुठल्या व्यक्तीला अन्यायकारक आणि सामान्य व्यक्तीच्या विकासाला अडथळा वाटू नये म्हणून नीतिनियम व बंधणे असतात. संबंधित बंधनातून भ्रष्टाचार कमी करता येतो. नियमबाह्य वर्तनाला थांबविण्याकरिता **जे. अब्राहमनुसार** एक स्वतंत्र नियंत्रण व्यवस्था असायला पाहिजे. ज्यामुळे पुष्कळ अंशी भ्रष्टाचार थांबविता येईल. या दृष्टीनेही विचार केला पाहिजे. त्यातून आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची डागळलेली प्रतिमा स्वच्छ करता येते. भ्रष्टाचारामुळे समाजात आर्थिक विषमता वाढली. या आर्थिक विषमतेमधून इतर

Scanned with CamScanner

सामाजिक समस्या निर्माण झाल्या. भ्रष्टाचारावर आळा बसला तर इतर सामाजिक समस्यांची धार कमी करता येईल. म्हणून भ्रष्टाचारावर निर्बंध घालण्याला उपायांचेही प्रस्तुत युनिटमध्ये विचार करणे अध्ययनाच्या दृष्टीने सोयीचे ठरेल. त्यामुळेच प्रस्तुत युनिटमधून आपल्याला भ्रष्टाचाराचा अर्थ, प्रकार किंवा वर्गीकरण, भ्रष्टाचाराचे कारक, भ्रष्टाचाराचे दुष्परिणाम आणि भ्रष्टाचार थांबविण्याचे उपाय इत्यादींचा विचार प्रस्तुत प्रकरणामधून करायचा आहे. तो पुढीलप्रमाणे आहे.

•••

Scanned with CamScanner

प्रकरण 23.

# भ्रष्टाचार

(Corruption)

देशात भ्रष्टाचाराची समस्या आताची नसून प्राचीन काळापासूनची आहे. ऐतिहासिक तथ्यामधून आपल्याला लक्षात येते. परंतु अलिकडील काळात भ्रष्टाचाराचे विकराल स्वरूप गंभीर बनले आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रामधील सेवक भ्रष्टाचारामुळे मालक बनलेले आढळते. भ्रष्टाचाराने निर्लज्जपणाची सीमा पार केल्याचे दिसते. भ्रष्टाचार सामान्य लोकांना जहर आणि श्रीमंतांना पर्वनी बनला. कारण भ्रष्टाचाराने सामान्य लोकांच्या विकासात्मक योजना गिळंकृत केल्याचे आढळते. माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांनी भ्रष्टाचारावर भाष्य करताना म्हटले होते की, दिल्लीमधून सामान्य लोकांच्या योजनांकरिता निघालेले 100 रुपये गल्लीपर्यत केवळ 10 रुपयेच पोहोचतात. यावरून आपल्या लक्षात येते की, भ्रष्टाचार किती खोलपर्यंत रुजलेला आहे. भ्रष्टाचाराने प्रत्येक क्षेत्र व्यापलेले दिसते. सरकारी क्षेत्रात तर भ्रष्टाचाराने थैमान घातले. त्यामुळे भ्रष्टाचाराची तिव्रता अधिकाधिक वाढत आहे. भ्रष्टाचारामुळे काम टाळण्याची प्रवृत्ती जोर धरू लागली. त्यामुळे भ्रष्टाचार सामान्य वर्गाच्या दृष्टीने एक ज्वलंत सामाजिक समस्या बनली आहे. म्हणून भ्रष्ट आचरण हा गुन्हा ठरविल्याने सामाजिक व्यवहार कुठल्याही व्यक्तींना अन्यायकारक न वाटता नितीनियमंने आणि बंधने असल्याशिवाय जीवन जगणे शक्य होणार नाही. तेव्हा समान कायदे, मूल्ये आणि नितीनियम यांच्या योग्य वर्तन कुठले ते निश्चित केलेले असते. त्या योग्य वर्तनशिवाय मनात येईल तसे नियमबाह्य वर्तन म्हणजे भ्रष्टाचार होय.

## भ्रष्टाचाराचा अर्थ

(Meaning of Corruption)

अलिकडील काळात भ्रष्टाचाराची एक ज्वलंत समस्या निर्माण झालेली आढळते. भ्रष्टाचार शासकीय क्षेत्रापासून तर धार्मिक क्षेत्रापर्यंत भ्रष्ट वर्तनाची सीमा गाठली. त्यामुळे भ्रष्टाचाराच्या समस्येने गंभीर स्वरूप धारण केल्याचे आढळते. भ्रष्टाचाराने भारतच नव्हे तर इंग्लंड, अमेरिका, पाकिस्तान इत्यादी देशात सर्वत्र भ्रष्ट आचरणाची व्यापकता वाढली. म्हणून भ्रष्टाचाराने सार्वत्रिकता गाठल्याचे आढळते. भारतात मात्र भ्रष्टाचाराने उग्रता ओलांडल्याचे दिसते. त्यामुळे भ्रष्टाचाराचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या व्याख्या पाहणे गरजेचे आहे. त्यादृष्टीने भ्रष्टाचाराचा अर्थ स्पष्ट करणाऱ्या व्याख्या पुढीलप्रमाणे आहेत.

Scanned with CamScanner

(1) **राबर्ट सी. ब्रुक्स** (Robert C. Brooks) **यांच्या मतानुसार, ''कुठल्याही प्रकारचा प्रत्यक्ष या अप्रत्यक्ष व्यक्तीगत फायदा मिळविण्यासाठी जाणूनबुजून प्रदत्त कर्तव्याचे पालन न करणे म्हणजे राजकीय भ्रष्टाचार होय. भ्रष्टाचार हा कुठल्याही स्पष्ट वा अस्पष्ट फायद्यासाठी कायदा व समाजाच्या विरोधात केला जातो.''**

(2) **इलियट व मेरिल** (Eiliott & Merrill) **यांच्यानुसार, ''प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष फायदा मिळविण्याच्या दृष्टीने जाणीवपूर्वक निहीत कर्तव्याचे पालन न करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''**

भ्रष्टाचार प्रतिबंध कायद्याने सार्वजनिक पदाचा स्वतःच्या स्वार्थाकरिता केलेले दुरुपयोग असा भ्रष्टाचाराच्या व्याख्येत अर्थ स्पष्ट केलेला आढळून येतो. भ्रष्टाचारअंतर्गत कर्तव्यभावनेला जाणीवपूर्वक केलेले दुर्लक्ष म्हणजे भ्रष्ट वर्तन प्रकारात मोडते. या अर्थाने भ्रष्टाचार व्यक्तीगत किंवा सामुहिक स्वरूपाचा असतो. भ्रष्टाचारी वर्तन अनुचित मार्गाला अवलंबू करते. थोडक्यात असे म्हणता येईल की, व्यक्तीगत स्तरावर कुटुंबातील सदस्यांकरिता आर्थिक फायदा मिळवून देण्याच्या दृष्टीने जाणीवेतून प्रत्यक्ष कर्तव्याचे पालन न करणारे वर्तन म्हणजे भ्रष्टाचार होय. स्वार्थमय जीवन आणि विषमतादर्शक स्थितीमुळे वाईट वर्तनाचे भिन्नभिन्न पैलू आढळतात. म्हणून भ्रष्टाचाराची जटिलता भ्रष्टाचाराच्या विविध प्रकारांमधून आढळून येते. ज्यामुळे भ्रष्टाचाराची तंतोतंत अर्थ स्पष्ट करणारी व्याख्या करणे शक्य नाही.

### भ्रष्टाचाराचे वर्गीकरण

भ्रष्टाचाराने संपूर्ण व्यवस्था ज़र्जर वर्गीकृत झाल्याचे आढळून येते. सरकारी बाबू, कुठलेही काम अगदी सहजासहजी करत नाही. त्यामुळे काम टाळण्याचा प्रकार या आधारे सुद्धा भ्रष्टाचाराचे वर्गीकरण होऊ शकते. कारण भ्रष्टाचार करणारी यंत्रणा नवनवीन पळवाट शोधत असते. म्हणून भ्रष्टाचाराचे क्षेत्रीय आधारे वर्गीकरण केले जाते. सरकारी अधिकारी, पोलीस अधिकारी, उद्योजक, व्यापारी, राजकीय नेते, सामान्य लोक इत्यादींच्या आधारे भ्रष्टाचार वर्गीकृत केला जातो. याशिवाय धार्मिक, सामाजिक, प्रशासन आर्थिक इत्यादींचा आधार घेऊन भ्रष्टाचाराला वर्गीकृत करता येते. भिन्नभिन्न क्षेत्राच्या आधारित भ्रष्टाचाराचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

(1) **प्रशासन क्षेत्रातील भ्रष्टाचार** (Corruption in Administration) **:** केंद्र सरकारचे प्रशासन असो की राज्याचे प्रशासन असो, प्रत्येक प्रशासन क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार बरबटलेला आढळतो. प्रत्येक मंत्रालयातील बाबू आणि संबंधित अधिकारी भ्रष्टाचाराच्या गंगेत न्हाऊन निघालेला दिसून येतो. टेबलाखालून पैसा गेल्याशिवाय कुठलीही फाईल पुढे सरकत नाही. भ्रष्टाचार स्थानिक क्षेत्रापासून तर न्यायालयीन क्षेत्रापर्यंत भ्रष्ट आचरणासारखे अनुचित प्रकार आढळून येतात. या दृष्टीने प्रशासन क्षेत्रातील भ्रष्टाचाराचे विभाजन पुढीलप्रमाणे करता येईल.

Scanned with CamScanner

(i) **सरकारी कार्यालयीन भ्रष्टाचार :** सरकारच्या कार्यालयीन भ्रष्टाचार सर्वश्रुत आहे. सार्वजनिक बांधकाम मंत्रालयाचे कार्यालय, शैक्षणिक मंत्रालयाचे कार्यालय, कृषी मंत्रालयाचे कार्यालय इत्यादी. सर्वच मंत्रालयासंबंधीत कार्यालयामध्ये सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळलेला दिसून येतो. त्यामुळे पैशाची गड्डी मिळाल्याशिवाय संबंधीत फाईल पुढे सरकतच नाही. एखाद्या कर्मचाऱ्याने भ्रष्ट आचरणाचा विरोध केला तर त्याची बदली केली जाते. कुठलेही कंत्राट अनधिकृत व्यवहार केल्याशिवाय संबंधित व्यक्तीला मिळत नाही. एखादा कार्यालयीन अधिकारी नियमबाह्य काम करत नसेल तेव्हा त्याच्यावर दडपण आणले जाते. त्याला मानसिक त्रास देण्याचा प्रयत्न केला जातो. कार्यालयीन क्षेत्रात सामान्य लोकांचे अगदी साधारण कामे महिनो गिणती होत नाही कारण सामान्य माणूस केवळ हेलपाट्या मारू शकतो. टेबलाखालून तो पैसे देऊ शकत नाही.

(ii) **न्यायालयीन भ्रष्टाचार :** न्यायालयीन क्षेत्रात शिपायापासून तर न्यायदानाचे कार्य करणाऱ्या न्यायधिशापर्यंत अनुचित प्रकारचे भ्रष्ट आचरण व्यापक प्रमाणात दिसून येते. सामान्य व्यक्ती योग्य न्यायापासून कोसोदूर आहे. कारण न्यायधीश भ्रष्टाचाराने लिप्त होऊन तरखा पुढे ढकलत असतो. निवाडेच्या निवाडे बदलले जातात. त्यामुळे न्यायव्यवस्थेवर सामान्य लोकांचा विश्वास राहिला नाही. म्हणून न्यायालयीन भ्रष्टाचार देशाच्या दृष्टीने अतिशय घातक प्रकार ठरतो. लोकांना न्याय देणारे मंदिर जर भ्रष्टाचारामध्ये लिप्त असतील तर सामान्य लोकांनी कुठे जावे. हा प्रश्न देशातील न्यायदानाविरोधी असंतोष निर्माण करणारा आहे.

(iii) **पोलीस यंत्रणेतील भ्रष्टाचार :** देशातील पोलीस यंत्रणा भ्रष्टाचाराने किडलेली आहे. अनेक पोलीस स्टेशन, जुगार व लाचखोरीचे अड्डे बनलेले आहेत. सर्वात जास्त भ्रष्टाचारी यंत्रणा म्हणून पोलीस यंत्रणेचा विचार केला जातो असे खेदाने म्हणावे लागते. कायद्याचा दुरुपयोग कसा करावा हे पोलीस अधिकाऱ्यांना चांगले माहित आहे. चोरी, दरोडेखोरी महिलाविरोधी हिंसाचार व वेश्या व्यवसाय इत्यादी अनेक कायदे असतांना कसे सुरळीत चालतात याचे गमक भ्रष्ट पोलीस यंत्रणेत आपल्याला आढळते. या पोलीस यंत्रणेतील भ्रष्टाचारामुळे सरईत गुन्हेगार मोकाट फिरताना आढळतात. ज्यामुळे समाजाचे स्वास्थ्य धोक्यात आलेले दिसत आहे.

(iv) **स्थानिक प्रशासनामधील भ्रष्टाचार :** ग्रामपंचायतीपासून तर महानगर-पालिकेच्या प्रशासन क्षेत्रापर्यंत सर्वत्र भ्रष्टाचार आढळतो. सर्वच ठिकाणी भ्रष्टाचारी स्वार्थ सिद्धीचे अचूक तंत्र पहायला मिळत आहे. झटपट श्रीमंत होण्याच्या लालसेने देशाचा सत्यानाश स्थानिक प्रशासनाने चालविलेला आढळतो. स्थानिक प्रशासंनातील भ्रष्टाचारामुळे सामान्य लोकांना वेठीस धरल्या जाते. तहसील कार्यालयात कुठलेही काम लाच दिल्याशिवाय होत नाही. जातीच्या दाखल्यापासून तर उत्पन्नाच्या दाखल्यापर्यंत लाच फेकल्याशिवाय काम होत नाही.

Scanned with CamScanner

(2) **राजकीय क्षेत्रामधील भ्रष्टाचार** (Corruption in Political Field) : राजकारण क्षेत्रातील भ्रष्टाचाराने इतर क्षेत्रातील भ्रष्टाचार द्विगुणीत केल्याचे आढळते. अनेक राजकीय नेते भ्रष्टाचारात लिप्त आहे. राजकीय नेते आणि प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी यांचे गठबंधन राजकीय नेते सत्तेचा दुरुपयोग करून अब्जो रुपये लुटल्याचे आढळते. सामान्य जनतेचा पैसा भ्रष्टाचारी नेते स्वतःच्या भौतिक सुखामध्ये उधळत आहे. सामान्य माणूस अधिकाधिक गरीब होत आहे. सत्ताधारी राजकीय नेते अधिकाधीक गर्भश्रीमंत होत आहेत. राजकीय नेत्यांच्या भ्रष्टाचारामुळे देशाचा विनाश होत आहे. राजकीय नेते निवडून येण्याकरिता अनुचित मार्गांचा अवलंब करतात आणि निवडून आल्यावर सात पिढ्यांची श्रीमंती कशी होईल याचा विचार करतांना आढळतात. देशसेवेच्या नावाने विधान सभेतील आमदार आणि लोक सभेतील खासदारांना पैसे पुरवून काही राजकीय पक्ष आपल्या बाजूने मत मिळविण्याचा प्रयत्न करतांना आढळतात.

भ्रष्टाचारी राजकीय नेते अनुचित मार्गाने कार्यकर्त्यांच्या सहकार्याने निवडणूक जिंकतात आणि सत्तेवर येताच कार्यकर्त्यांना महामंडळ, वाईन शॉपचा परवाना आणि सार्वजनिक पदाच्या नियुक्तीकरिता अयोग्य लोकांची शिफारस करतांना आढळतात. नंतर त्यांच्या कामात हस्तक्षेप करून स्वतःच्या फायद्याकरिता उपयोग करून घेतात. वाईन शॉपचा परवाना दिलेल्या व्यक्तीकडून निवडणूकीच्या काळात वाईनच्या पेट्या वाटतांना आढळतात. असे अनेक भ्रष्टाचारांचे चक्र राजकीय नेत्यांकडून चालत आहे.

(3) **शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार** (Corruption of Education Field) : भ्रष्टाचाराने ज्ञानाच्या मंदिरांनासुद्धा सोडले नाही. देशातील विद्यापीठात अनेक कोहचाडे ज्यांनी लाखो रुपये घेऊन वैद्यकीय आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील पदव्या प्रसादाप्रमाणे वाटल्याचे आढळते. भ्रष्टाचारामुळे उच्च शिक्षणाचा बाजार मांडलेला आढळतो. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे भ्रष्ट राजकीय नेत्यांनी व्यावसायिक महाविद्यालये सुरू केलेली आहेत. संबंधित महाविद्यालयात विद्यार्थ्यांकडून महागडी फी वसूल केल्या जात आहे. वरपासून खालपर्यंत साटेलोटे असल्याने तक्रारी करूनही कुठल्याच प्रकारची संबंधीत महाविद्यालयाच्या प्रशासनावर कारवाई होताना दिसत नाही. अलिकडील काळात नामी उद्योजक शिक्षण क्षेत्रात आलेले आढळतात. त्यांनी मेडिकल कॉलेज व अभियांत्रिकी कॉलेज सुरू करून लाखो रुपये डोनेशनच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रवेश देताना व घेताना आढळतात आणि महत्त्वपूर्ण बाब म्हणजे सरकारचे यावर कुठलेही नियंत्रण नाही. कित्येक शिक्षण संस्था अनुचित मार्गाचा अवलंब करून खोटे प्रवेश दाखवून सरकारकडून लाखो रुपये शिष्यवृत्ती नावाने मिळविल्याचे आढळते.

(4) **धार्मिक क्षेत्रामधील भ्रष्टाचार** (Corruption in Religious Field) : धर्म–कर्माच्या नावाने भोंदू लोक सामान्य भोळ्या लोकांचा अनुचित फायदा घेतांना आढळतात. धर्माच्या आड भ्रष्टाचार आढळतो. राम–रहिम आणि आसाराम बापूसारखे स्वयंघोषित

Scanned with CamScanner

संत यांनी स्वतःचे आश्रम उघडून लोकांच्या श्रद्धेचा फायदा घेऊन लोकांना लुबाडलेले आढळते. या स्वयंघोषित संताकडे करोडो रुपयांची संपत्ती आढळली. जी धार्मिक क्षेत्रातील भ्रष्टाचारांमधून मिळविलेली आढळते. तिर्थक्षेत्रे भ्रष्टाचाराचे व भ्रष्ट वर्तणूकीचे माहेरघर बनल्याचे दिसून येते.

(5) **वैद्यक क्षेत्रामधील भ्रष्टाचार** (Corruption in Medical Field) : पूर्वीच्या काळात वैद्यकीय क्षेत्र सेवानिष्ठ होते. कुठल्याही प्रकारचे पैसे उकडण्याचे साधन नव्हते. अलिकडील काळात मात्र वैद्यक क्षेत्र भ्रष्टाचार लिप्त असलेले आढळून येते. गैरमार्गाने डॉक्टर्स वर्ग पैसे मिळवितांना आढळतात. खाजगी दवाखाने भ्रष्टाचाराचे केंद्र बनल्याचे आढळते. रोग्यांना आवश्यकता नसताना विभिन्न प्रकारच्या चाचण्या करायला सांगतात. एखाद्या व्यक्तीचा व्हेंटिलेटरवर मृत्यूही झाला तरी जास्तीचे पैसे मिळविण्या–करिता जास्त काळ जिवंत आहे असे दर्शविण्याचा प्रयत्न करतांना आढळतात. खाजगी दवाखान्यात एखाद्या पेसंटला ऑपरेशनची गरज नसताना केवळ पैशाकरिता त्याच्या विशिष्ट अवयवाचे ऑपरेशन करतांना आढळतात. डॉक्टराचे इतर डॉक्टरांसोबत लागेबांधे असतात. केवळ पेशंट पाठविण्याचे पैसे मिळविताना आढळतात. त्याचा परिणाम रोग्यांवर होतांना आढळतो.

(6) **सामाजिक क्षेत्रामधील भ्रष्टाचार** (Corruption in Social Field) : देशात समाजसेवांच्या नावाने सुद्धा भ्रष्टाचार चालतो. स्त्री सुधार केंद्र, वृद्धाश्रम, अनाथालय इत्यादी समाजसेवेच्या माध्यमातून मोठमोठ्या स्वरूपात देणग्या मिळविल्या जातात. संबंधित आश्रमात प्रवेश केलेल्या लोकांकडून अवास्तव पैसे लुबाडल्या जातात. डान्स क्लबच्या नावाने वेश्या व्यवसाय चालविल्या जाण्याचा प्रकार भ्रष्ट आचरणामध्ये मांडतो. कारण वेश्या व्यवसाय चालविणे नियमबाह्य प्रकार असतो. महिला सुधार केंद्राच्या आड व्यभिचार चालतो.

(7) **वैयक्तिक भ्रष्टाचार** : आपल्या देशात लैंगिक दुराचार जुगार व सट्टा खेळण्याचा प्रकार, मद्यपानात लिप्त असण्याचा प्रकार हे सगळे अनुचित नियमबाह्य वर्तन असल्याने भ्रष्ट आचरणामध्ये मोडतात. सामाजिक निती नियमांचे त्यांना भान नसते. असे लोक गैरमार्गाने पैसा मिळवितांना आढळतात. वैयक्तिक क्षेत्रातील भ्रष्ट आचरण कुठल्याही वाममार्गाचा अवलंब करून पैसे मिळवितांना आढळतात. अनेक व्यावसायिक अल्प उत्पन्न भासवून सरकार दरबारी कर चूकवितांना आढळतात.

अशाप्रकारे भ्रष्टाचाराचे वर्गीकृत प्रकार आहेत. भ्रष्टाचाराचा दानव प्रत्येक क्षेत्रात कमी अधिक प्रमाणात भ्रष्टाचार आढळून येतो. भ्रष्टाचारामुळे नैतिक, अनैतिकतेमधला फरक नाहीसा झाला आहे. भ्रष्टाचारापासून धार्मिक मंदिरे अलिप्त नाहीत. त्यामुळे प्रत्येक क्षेत्रातील भ्रष्टाचार देशाला लुबाडत असून मनुष्याचे बौद्धीक पतन झाल्याचे आढळते. म्हणून भ्रष्टाचार एक गंभीर सामाजिक समस्या निर्माण झाल्याचे आढळते.

Scanned with CamScanner

## भ्रष्टाचाराचे कारक
### (Causes of Corruption)

भ्रष्टाचाराच्या वर्गीकरणामधून आपल्या लक्षात येते की, देशात सार्वजनिक क्षेत्रामध्ये व्यापक स्तरावर भ्रष्टाचार आढळून येतो. राजकारण आणि सार्वजनिक क्षेत्रातील प्रशासन वर्ग यांच्यातील विकृत गठबंधन भ्रष्टाचाराची गंगोत्री ठरत आहे. कायद्यामधील पळवाटा, राजकीय नेत्यांची स्वार्थ भावना, नैतिक मूल्याचा ऱ्हास, राजकीय हस्तक्षेप, भौतिक सुखाची ओढ, लोकशाहीची विकृत परिस्थिती, राजकीय संस्थांची व्यापकता अशी अनेक कारकांमधून भ्रष्टाचार दिवसेंदिवस कमी होण्याऐवजी वाढत आहे. या दृष्टीने भ्रष्टाचाराचे कारक किंवा घटक पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

(1) **उद्योजक व राजकीय नेत्यांची युती :** आज सार्वत्रिक स्वरूपात उद्योजक, व्यापारी व राजकीय नेतृत्व यांची युती भ्रष्टाचारकारक बनत आहे. अनेक मंत्रालयाचे खाजबी संबंध मोठमोठ्या उद्योजकांशी आहे. देशाच्या विकासात्मक नितीमध्ये किंवा धोरणात्मक निर्णयामध्ये उद्योजकांचा प्रत्यक्ष सहभाग दिसून येतो. त्यामुळे उद्योजकांना तिथे फायदा पोहचविण्याच्या दृष्टीने धोरण आखले जात आहे. खाजगीकरणाच्या प्रक्रियेत उद्योजक व मोठमोठे व्यापारी राजकीय नेत्यांना बक्षीस रूपात किंवा त्यांच्या राजकीय पक्षांना निवडणूकीच्या खर्चाकरिता देणगी रूपात पैसा पुरवितात. मागील लोकसभा निवडणूकीत प्रचाराकरिता आधुनिक विमान पुरविल्याचे सरकारी दस्तऐवजमध्ये नोंद असल्याचे आढळते. विजय माल्याने भारतीय बँकांना कोट्यवधी रुपयाचा चूना लावून राजकीय नेत्यांनी त्याची विदेशात जाण्याची व्यवस्था कशी केली हे सर्वांनाच माहीत आहे. हिरे व्यापारी असो वा निरव मोदी असो हे सगळे राजकीय नेते व उद्योजकांचे गठबंधन दर्शविणारी उदाहरणे आहेत. जे भ्रष्टाचाराला कारणीभूत ठरतात. अनेकदा उद्योजक घराण्यातील भ्रष्टाचार पांघरून राजकीय नेते करीत असतात. त्यामुळे भ्रष्टाचार अधिकाधिक फोफावतो आहे.

(2) **लोकशाही शासनअंतर्गत पक्षीय लोकांना सार्वजनिक उच्च पद देणे :** लोकशाही शासन प्रणालीमधील महामंडळे, कृष्णा खोरे महामंडळ आणि सार्वजनिक पदाच्या प्रमुख म्हणून सत्तेत असणाऱ्या पक्षीय नेत्यांना खैरात वाटली जाते. म्हणून हे लोक स्वतःच्या स्वार्थाकरिता त्या पदाचा दुरुपयोग करीत असतात. जेजे अधिकारी वर्ग त्याच्या अनुचित कार्यात अडथळा आणतात त्यांच्या बदल्या करवून घेतात. त्यामुळे भ्रष्ट आचरणामध्ये दिवसेंदिवस वाढ होतांना आढळते.

(3) **मूल्यात्मक बदल :** अलिकडील काळात भौतिकवादाचा प्रभाव वाढत आहे. चंगळवाद वाढल्याने भ्रष्टाचार वाढला आहे. भौतिक सुखाकरिता नितीनियमांच्या चौकटीत मिळविलेला पैसा पूरत नाही. त्यामुळे भ्रष्ट मार्गाने पैसा मिळविण्याची सवय लोकांना लागली आहे. व्यक्तीची प्रतिष्ठा त्यांच्या संपत्तीवरून ठरत असते. मानसन्मान

Scanned with CamScanner

मिळतो त्यामुळे पैसा कमविण्याचा मार्ग कुठलाही असो योग्य किंवा अयोग्य अशा कुठल्याही मार्गाने व्यक्ती पैसा मिळवितो. समाजात आर्थिक मूल्यांना व्यक्ती महत्त्व देतो. म्हणून सामाजिक मूल्यांना विसरून व्यक्ती गैरमार्गाने पैसा मिळवितो. त्यामुळे मूल्यात्मक बदलाचा परिणाम भ्रष्टाचार वाढण्यात झाला. **प्रा. दादा मानकर** यांनी भौतिकवादी प्रवृत्तीमधून भ्रष्टाचार वाढत आहे असे म्हटले आहे.

(4) **राजकीय हस्तक्षेप** : देशाचे आजचे भ्रष्टाचाराचे विकृत स्वरूप राजकीय-हस्तक्षेपामुळे झाले आहे. **मा. एच. एफ. ख्रिस्ती** यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात 15 वर्षे आणि स्वातंत्र्यानंतर 15 वर्षे स्वतंत्र भारतात प्रशासनात नोकरी केली. त्यांनी प्रशासनात राजकारण घुसल्याने नोकरशाही भ्रष्ट झाल्याचे म्हटले आहे. मंत्र्यांच्या जी हुजूरीमध्ये धन्यता मानतात. काही दिवसाने मंत्री स्वतःच्या स्वार्थसिद्धीकरिता अधिकाराचा गैरवापर करतात म्हणून देशात भ्रष्टाचार अधिकाधिक वाढत आहे. चापलूसी अधिकारी मंत्र्याच्या भोवताल फिरतात. त्यामुळे नियमबाह्य तत्वांच्या विरोध कारवाई ठरण्याचा उत्साह त्यांच्यात नसतो. याचा परिणाम भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळते.

(5) **कायद्यामधील पळवाटा** : भ्रष्टाचार करणारे लोक कायद्यामधील पळवाटा काढून निर्दोष सुटतांना आढळतात. त्यामुळे पोलीस, कायदा व न्यायालय इत्यादींची लोकांना भितीचा प्रश्नच राहत नाही. उलट पैशाच्या जोरामुळे न्याय व्यवस्था व पोलीस यंत्रणा यांना विकत घेता येते याची जाणीव भ्रष्टाचारी लोकांना असल्यामुळे अवांच्छित व्यवहार करण्याची हिम्मत वाढत असते. म्हणून देशात भ्रष्टाचार बोकाळला आहे.

(6) **भ्रष्टाचार निर्मूलनार्थ सक्षम विभागाचा अभाव** : भारतात भ्रष्टाचार निर्मूलनार्थ जे विभाग आहे ते सरकारच्या नियंत्रणाखाली आहेत आणि भ्रष्टाचारावर आळा घालणारे विभाग सक्षम नाहीत. त्यांच्या कार्यपद्धतीत अनेक दोष आहेत. काही अधिकाऱ्यांचे भ्रष्टाचारी लोकांसोबत लागेबांधे आहेत. जे लोक भ्रष्टाचारविरोधात आवाज उठवितात त्यांना भ्रष्टाचारी लोक सरकारच्या सहकार्याने त्रास देतात. काही संघटनांच्या पदाधिकाऱ्यांचे भ्रष्टाचार लोकांसोबत हितसंबंध जुळलेले असतात. म्हणून भ्रष्टाचार अधिकाअधिक वाढत आहे.

(7) **कायद्याच्या अंमलबजावणीमधील दिरंगाई** : भ्रष्टाचारावर नियंत्रण साधण्याकरिता अनेक कायदे आहेत. परंतु त्या कायद्याची कठोर अंमलबजावणी होत नाही. कायदा अंमल करणारी यंत्रणा भ्रष्ट आहे. भ्रष्टाचारी व्यक्तीला कडक शिक्षा होत नाही. योग्य पुराव्याअभावी भ्रष्टाचारी लोकांचे सुटण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे अशा लोकांचा समाजात प्रभाव वाढतो. म्हणून त्यांच्या विरोधात लोकांना बोलण्याची हिंमत होत नाही आणि इकडे कायद्याची दिरंगाई त्यामुळे भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढत आहे.

(8) **मौद्रीक व्यवस्थेची व्यापकता** : अलिकडील काळात मौद्रिक व्यवस्थेची व्यापकता वाढली. कुठल्याही व्यक्तीला व्यावहारिक सुलभता आली कितीही पैसा

Scanned with CamScanner

मिळविला तरी लपविणे सहज सोपे झाले. त्यामुळे अनैतिक मार्गाने मिळविलेला पैसा लपविणे सहज झाले. बँकांच्या व्यापकतेमुळे कमीतकमी वेळात भ्रष्टाचारातून मिळविलेला पैसा बँकामध्ये ठेवणे सोयीचे झाले. म्हणून भ्रष्टाचाराची प्रवृत्ती वाढत आहे.

अशाप्रकारे देशात भ्रष्टाचाराचे कारक आहेत. वरील सर्वच कारक कमी जास्त प्रमाणात भ्रष्टाचाराला कारणीभूत आहेत. याशिवाय राजकीय संस्थांची व्यापकता, वरिष्ठ पातळीवरचा भ्रष्टाचार, नैतिक मूल्यांचा ऱ्हास इत्यादी अनेक कारकांमुळे भ्रष्टाचार सतत वाढत आहे.

## भ्रष्टाचाराचे दुष्परिणाम

(Effects of Corruption)

देशात भ्रष्टाचारामुळे अनेक समस्यांना जन्म दिल्याचे आढळते. भ्रष्टाचारी लोक देशाच्या संपत्तीचे विश्वस्थ नसून भक्षक असल्याने त्याचे दुष्परिणाम विक्रूरता धारण करणारे आहेत. समाज संघटनेला धोका निर्माण करीत आहेत. **मा. एफ. एच. ख्रिस्ती** यांनी म्हटल्याप्रमाणे, ''भ्रष्टाचाराचे विघातक परिणाम हे देशाच्या प्रशासनिक क्षेत्रात निष्क्रीयता वाढविणारे असून शिस्तबद्ध कार्यप्रणालीवर आघात झाला आहे.'' भ्रष्टाचारामुळे राजकारणात गुंडगिरी वाढून आपण विकासाच्या दिशेने जात आहोत की, अधपतनाच्या दिशेने जात आहोत असा विचार करण्याच्या गरजेइतके दुष्परिणाम झालेले आढळतात. त्यामुळे भ्रष्टाचाराच्या दुष्परिणामाचा विचार होणे गरजेचे आहे. ते पुढीलप्रमाणे आहेत.

(1) **नैतिकेचे अधपतन :** भ्रष्टाचारामुळे भ्रष्ट लोकांना समाजात कितीही प्रतिष्ठा असली तरी त्यांच्या नैतिकतेचे अधःपतन झाल्याचे आढळते. समाजाच्या नैतिक मूल्याचे पतन होऊन समाजाच्या अस्थिरतेला धोका निर्माण झाला आहे. समाजाची नैतिकता खालावलेली आहे. कारण भ्रष्टाचारामध्ये अनेक लोक लिप्त असतात. एकमेकांच्या सहकार्याने भ्रष्टाचार घडून येतो. त्या सर्वांचे नैतिक अधपतन झाले आहे.

(2) **देशाच्या सर्वांगीण विकासावर परिणाम :** भ्रष्टाचाराचा दुष्परिणाम हा देशाच्या सर्वांगीण विकासावर होत आहे. भ्रष्टाचारी लोकांनी देशाचे करोडो रूपये गिळंकृत केले. त्यामुळे देशाची प्रगती खुंटली. सर्वसामान्यांच्या योजनांकरिता सरकारकडे पैसा नसेल तेव्हा कर्जाचा बोजा वाढतो. देशाचे जास्तीतजास्त उत्पन्न कर्ज फेडण्यात जातो. म्हणजेच देशाच्या विकासावर वाईट परिणाम भ्रष्टाचारामुळे होतो. देशाच्या विकासामध्ये अडथळे निर्माण झाले तर समाजात अस्थिरता निर्माण होते. अशा अस्थिरतेमधून लोकशाहीवर प्रतिकूल परिणाम झाल्याचे आढळते.

(3) **कायदा सुव्यवस्थेवर वाईट परिणाम :** देशात सर्वत्र भ्रष्टाचार बोकाळल्यामुळे खुलेआम रिश्वतखोरीचे प्रमाण वाढले असून कायदा सुव्यवस्थेवर त्याचा विघातक परिणाम झाला. कारण भ्रष्टाचार करणाऱ्या लोकांवर योग्य कारवाई होत नसेल तेव्हा

Scanned with CamScanner

कायदा व्यवस्थेचा लोकांवर धाक राहात नाही आणि कायदा व सुव्यवस्थेचे पालन करणाऱ्या लोकांवरही त्याचा वाईट परिणाम होत आहे. पोलीस यंत्रणा त्याचा त्रास देत असते. पर्यायाने कायदा सुव्यवस्थेवर लोकांचा अविश्वास वाढत जातो. कायद्याचे उल्लंघन करणारे लोक विघातक कृत्यात सहभागी होतांना दिसतात. त्यामुळे सामाजिक अस्थिरता निर्माण होते. समाजात स्वैराचार निर्माण होतो.

(4) **आर्थिक विषमतेमध्ये वाढ :** देशातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे समाजात आर्थिक विषमता वाढली. भ्रष्टाचारी लोक अधिक श्रीमंत झाले. सामान्य वर्ग अधिकाधिक गरीबीत जीवन कंठत आहेत. अशा आर्थिक विषमतेमधून समाजात तणावाची स्थिती व द्वेषाची भावना वाढत आहे. पर्यायाने देशाच्या आर्थिक विकासात भ्रष्टाचार अडंगा ठरत आहे. समाजातील आर्थिक विषमतेमुळे सामाजिक संघर्षाची स्थिती निर्माण झाल्याचे आढळते. भ्रष्टाचारामुळे आर्थिक विषमता अधिकाधिक गरिबीला जन्म देते आणि गरीब लोकांचे स्वास्थ्य धोक्यात आल्याचे दिसते.

(5) **प्रशासनावरील अविश्वास वाढला :** भ्रष्टाचारामुळे प्रशासन वर्गावरील सामान्य लोकांचा अविश्वास वाढतो. कारण प्रशासन अधिकाऱ्यांच्या संगनमताने लोक भ्रष्टाचार करतात. अशा भ्रष्ट प्रवृत्तीचे प्रशासन अधिकारी सामान्य लोकांच्या कामाकडे दुर्लक्ष करतो. दिवसेंदिवस त्यांच्या फाईली जागेवरच असतात. त्यामुळे प्रशासनावरील अविश्वास वाढत जातो. याचा परिणाम सामान्य लोकांवरही होतांना आढळतो. लोक प्रशासनाकडे शासंक नजरेने पहातात. प्रशासनावरील अविश्वास वाढण्याची गंभीर समस्या निर्माण होते.

(6) **गुन्हेगारी वृत्तीस प्रेरणा :** भ्रष्ट आचरण करण्याचा गुन्हा राजकारणी आणि प्रतिष्ठीत लोक करतात. भ्रष्टाचारामधून मिळविलेल्या काळ्या पैशामध्ये अनेक लोक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभागी असल्याने भ्रष्टाचाराशिवाय इतर गुन्हेगारीला प्रेरणा मिळते. अधिक पैसा कमविण्याच्या हव्याशापोटी इतर काळ्या धंद्यात पैसा गुंतवून अधिकाधिक पैसा मिळविण्याची त्यांना प्रेरणा मिळत असल्याशिवाय भ्रष्टाचारी लोकांवर कुठल्या प्रकारची शिक्षा पुराव्याअभावी होतांना दिसत नाही. त्यामुळे इतर लोकही गुन्हेगारी प्रवृत्तीला प्रेरीत होतांना आढळतात.

(7) **अकार्यक्षमतेला प्रोत्साहन :** भ्रष्टाचाराच्या विस्तारामुळे प्रशासन कार्यालया-मधील कर्मचाऱ्यांचा आळसीपणा, कामचूकार प्रवृत्ती, काम टाळण्याची वृत्ती, निर्लज्जपणा, उर्मटपणा आणि एकूणच परिणाम अकार्यक्षमतेला प्रोत्साहित केले जाते. आळसी व अकार्यक्षम असणाऱ्या ठेकेदारांना प्रोत्साहित करून त्यांनाच कंत्राट दिल्या जातो. समाजात उर्मटपणा आणि आळसीपणा वाढीला लागून अकार्यक्षम लोकांना अधिक महत्त्व दिले जाते. कामचूकार करणाऱ्या लोकांचा उदोउदो करून स्वतःची अकार्यक्षमता अनैतिक मार्गाने झाकण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे भ्रष्टाचारी प्रवृत्तीला पुन्हा पुन्हा प्रोत्साहन देण्याचा प्रकार घडत आहेत.

Scanned with CamScanner

(8) **आरोग्यात्मक दुष्परिणाम** : भ्रष्टाचार सर्वच क्षेत्रात वाढला आहे. भ्रष्टाचाराने जीवनावश्यक वस्तुंना सुद्धा मुक्त सोडलेले नाही. साधारणतः खाण्याच्या वस्तु, औषधी, खाद्यपदार्थ इत्यादी वस्तुंमध्ये भेसळ करण्याचे प्रमाण वाढलेले आहे. सर्वसामान्य लोकांना अशा भेसळयुक्त पदार्थ आणि इतर वस्तुंची ओळख करता येत नाही. भेसळयुक्त पदार्थाचा उपभोग घेतात. त्यामुळे सामान्य लोकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होतो. भेसळ केलेले पदार्थ खाण्यामधून विषारी द्रव्य पोटात जावून लोकांना अनेक दुर्धर रोग होण्याची भिती निर्माण झाल्याचे आढळते. एकंदरीत भ्रष्टाचारामुळे जनसामान्यांच्या आरोग्यावर फार मोठा दुष्परिणाम झालेला आढळून येतो.

(9) **भांडवलाची कमतरता** : भ्रष्टाचारामधून बेहिशोबी काळा पैसा व्यापक प्रमाणात जमा होतो. काळा पैसा चलनाच्या बाहेर असल्याने बचत व गुंतवणूक अल्प प्रमाणात होते. अल्प गुंतवणुकीमुळे औद्योगिक विकासाकरिता भांडवलाची कमतरता भासते. देशातील जनसामान्यात कल्याणात्मक योजनांकरिता भांडवल उभे करताना व्यापक रूपात अडचणी येतात. एकूणच काय तर भ्रष्टाचारामुळे उद्योगधंद्याच्या आणि इतर विकासात्मक योजनांकरिता भांडवलाची चणचण भासते. पर्यायाने देशात महागाई उत्पन्नात घट होवून त्यातूनच देशावर कर्जाचा डोंगर वाढत जातो.,

अशाप्रकारे भ्रष्टाचाराचे समाजावर एकूणच देशावर होणारे दुष्परिणाम आहेत याशिवाय काळा पैसा विघटनकारी तत्वाची वाढत, राष्ट्रवादी प्रवृत्तीला धोका, राष्ट्रहिताला बाधा इत्यादी दुष्परिणाम भ्रष्टाचारामुळे होतांना आढळतात.

## भ्रष्टाचार थांबविण्याचे उपाय

(Measures to Cheak Corruption)

आजच्या स्थितीत देशात भ्रष्टाचार लोकसंख्येच्या वाढीप्रमाणे वाढत आहे. सी.बी.आय. चे माजी संचालक एस.पी. त्यागी यांनी म्हटले आहे की, केंद्र आणि राज्य सरकारच्या विभागाद्वारे संचालित विभागामधील लिप्त भ्रष्टाचारामुळे प्रत्येक वर्षी एक लाख कोटींचा तोटा होतो. ते पुढे असेही म्हणतात, इमानदार जनप्रतिनिधी बोटावर मोजण्याइतके आहेत म्हणून सर्वच क्षेत्रामध्ये भ्रष्टाचार बोकाळला. भ्रष्टाचार योजनाबद्ध पद्धतीने होत असतो. त्यामुळे भ्रष्टाचाराची समस्या अतिभयावहता निर्माण करणारी ठरते की काय अशी शंका आपल्याला आल्यावाचून राहत नाही. म्हणून भ्रष्टाचाराच्या समस्येला पायबंद घालणे गरजचे नव्हे तर ती काळाची अतिआवश्यक गरज बनली आहे, नाही तर देश खड्यात गेल्याशिवाय राहणार नाही. भ्रष्टाचार निर्मूलन किंवा थांबविणे निश्चितच व्यापक समाज परिवर्तनाचा एक भाग आहे. योग्य कायदे असेल व त्याची परिणामकारक अंमलबजावणी होत असेल तर भ्रष्टाचार निर्मूलनास मदत झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु भ्रष्टाचाराचे व्यापक स्वरूप लक्षात घेतल्यास केवळ

Scanned with CamScanner

कायद्यात बदल केल्याने भ्रष्टाचार थांबविणे शक्य होणार नाही तर भ्रष्टाचार निर्मूलनातील जनसहभाग अतिशय महत्त्वाचा ठरतो.

भ्रष्टाचारविरोधी कायदा 1906 हा नागरिक सेवकांकरिता केला गेला. प्रस्तुत कायद्यानुसार स्वतःच्या पदाचा प्रभावामधून असामाजिक कार्य करणे म्हणजे लाच घेणे गुन्हा ठरविला होता. अनेक कायदे तज्ज्ञांनी आंतरराष्ट्रीय आयोग या ब्रिटिश शाखेने 1961 ला नागरिक व प्रशासन या नावाने एक व्हाईल रिपोर्ट सादर केली होती. या प्रस्तुतीनुसार ब्रिटीशांसाठी ओम्बडसनमेन शिफारस केली. ही ओम्बडसनमेन एक विश्वव्यापी यंत्रणा आहे. भ्रष्टाचारावर नियंत्रण साधण्याच्या हेतूने संन्थानम समितीने सुद्धा काही सूचना केल्या होत्या. जसे–राजकीय पक्षांना मिळणारे दान पूर्णपणे थांबविणे, राजकीय पक्षाच्या हिशेबावर नियंत्रण आणि प्रशासकीय व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रावर नियंत्रण साधणे इत्यादी सूचना केल्या होत्या. 1947 ला भ्रष्टाचार निरोधक कायदा पास झाला. 1946 च्या कायद्याप्रमाणे दिल्ली विशेष पोलीस प्रतिष्ठानची स्थापना सध्याच्या काळात त्याचे रूपांतर केंद्रीय अन्वेषण विभागामध्ये झाले (CBI). या विभागाद्वारे भ्रष्टाचारविरोधी विभागाचा एक भाग म्हणून कार्यरत आहे. भ्रष्टाचार निर्मूलनार्थ सरकारने भिन्नभिन्न परिस्थितीत विशेष समित्या गठीत केलेल्या आहेत. 1949 ला बख्शी टेकचंद समिती व रेल्वेअंतर्गत होणाऱ्या भ्रष्टाचार चौकशी समिती 1953 ला गठीत केली. भ्रष्टाचाराशी लढण्यासंदर्भात टेकचंद समितीच्या शिफारशीनुसार कायद्यामध्ये संशोधन करून 1955 ला सरकारी कामावरील विस्तारावर भ्रष्टाचाराबद्दल प्रत्यक्ष लक्ष ठेवण्यासाठी प्रशासन दक्षता विभागाची स्थापना केली. या विभागाद्वारे गृहमंत्रालयाचे प्रशासन आणि इतर मंत्रालय व विभागामधील चौकशी स्थापन करण्याचे अधिकार, अधिकाऱ्याद्वारे सत्तेचा दुरुपयोग आणि भ्रष्टाचाराची चौकशी करून दोषी लोकांना शिक्षा करणे हे काम प्रशासन दक्षता विभागाचे होते.

भ्रष्टाचार निवारणाच्या संदर्भात 1956 ला विवियन बोस आयोगाची नियुक्ती केली. प्रस्तुत आयोगाचे कार्यक्षेत्र हे विभागाच्या विविध पैलूंना आवश्यकतेनुसार प्रेरित करणे, समन्वय साधणे आणि निदेश या उद्देशाचे अध्ययन करणे हे होते. भ्रष्टाचाराचा छडा लावण्याच्या हेतूने 1964 ला भ्रष्टाचार निर्बंध समितीकडून व्यापक व स्पष्ट अधिकार असणाऱ्या केंद्रीय सर्तकता आयोग स्थापन करण्याचे सुचविले. भ्रष्टाचारामध्ये लिप्त असलेल्या आरोपींचा कुशलतेने छडा लावण्याकरिता पुढे केंद्रीय सतर्कता आयोगाची स्थापना केली. त्या आयोगाला योजना आयोगाचा दर्जा देऊन स्वतंत्र अधिकार दिले. हा आयोग परामर्श रूपाने मंत्रालय विभाग, व्यवसायात्मक चौकशी संदर्भात केंद्रीय विभागाच्या कार्यात समन्वय साधणे. या आयोगाला कामाच्या संदर्भात नागरी अधिकाऱ्यांवर नियमबाह्य भ्रष्ट मार्गाचा अवलंब करण्याचा आरोप आहे. त्याची चौकशी करणे, नागरी सेवकांच्या संदर्भात तक्रारीनुसार चौकशी करण्याचा अधिकार,

Scanned with CamScanner

मंत्रालय विभाग व इतर उद्योगांकडून लागणारे संदर्भ मागण्याचा अधिकार आणि आवश्यकतेनुसार कारवाई करणे व सामान्य निरीक्षणाच्या दृष्टीने आयोग स्वतःच्या नियंत्रणात ठेवण्याचा अधिकार इत्यादी स्वतंत्र अधिकार दिले होते. याशिवाय न्यायपालिकेच्या स्तरावर घडणाऱ्या भ्रष्टाचार संदर्भात विशेष अधिकार समिती स्थापन केली. या समितीच्या सूचनेनुसार संपूर्ण उच्च न्यायालयामध्ये एक सतर्कता संघटन स्थापन करण्याचे सुचविले. वेगवेगळ्या समित्या भिन्नभिन्न परिस्थितीनुसार सरकारने भ्रष्टाचारावर पायबंद घालण्याच्या दृष्टीने विविध उपाय केल्याचे आढळते. परंतु भ्रष्टाचाराच्या संदर्भाने भारतात प्रत्यक्ष हितसंबंधाच्या अर्थ राजकारणामुळे लुटपुटूचे भांडवलदार अनिल अंबानीसारखे तयार झाले. असे भांडवलदार आणि भ्रष्ट सत्ताधारी भ्रष्टाचारात लिप्त असेल तेव्हा भ्रष्टाचार निर्मूलनार्थ सर्वत्र उपाय कुचकामी ठरतात. भ्रष्टाचार थांबविण्याच्या समितीअंतर्गत जे अधिकारी किंवा लोक असतात मुळात तेच भ्रष्टाचारी आहेत. असे लोक भ्रष्टाचाराची निकोप चौकशी कशी करणार?

भ्रष्टाचार निर्मूलनार्थ अनेक तज्ञ अन्ना हजारेसारखे आंदोलक केंद्रीय अन्वेषण बुरोचे आजी व माजी संचालक राघवन, त्यागी आणि रंजित सिन्हा इत्यादींनी जे अनेक उपाय सुचविले आहेत त्यामधील काही उपाय पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

(1) **लोकपाल व लोकायुक्त :** सन्थानम समिती आणि भ्रष्टाचार विरोधी आंदोलकांनी केंद्र सरकारला लोकपाल व लोकायुक्त नियुक्त करण्याचे सुचविले आहे. तेव्हा सरकारने मंत्री व सरकारचे सचिव आणि वरिष्ठ अधिकारी यांच्या विरोधातील असणाऱ्या तक्रारीचे निवारण करण्याकरिता लोकपालाची नियुक्ती करावी. त्याचप्रमाणे केंद्र व राज्यांमधील अधिकाऱ्यांविरूद्ध भ्रष्टाचाराच्या तक्रारीचा छडा लावण्याकरिता लोकायुक्ताची नियुक्ती करावी. अशा नियुक्त्याकरिता जनसमुहाने सरकारवर दबाव आणला पाहिजे, तेव्हाच लोकपाल व लोकायुक्त यांची नियुक्ती सरकार करेल आणि भ्रष्टाचार निर्मूलन करण्याचा मार्ग मोकळा होईल.

(2) **राजकारणामधील नैतिकता उंचाविणे :** देशात राजकारण करणारे राजकीय नेते यांच्या नैतिकतेचा स्तर उंचाविणे गरजेचे आहे. कारण भ्रष्टाचाराचे मूळ राजकीय नेत्यांच्या अनैतिकतेमध्ये आहे. लोकशाहीमध्ये नैतिकता महत्त्वाची आहे आणि भ्रष्टाचाराचे निर्मूलन करण्याची भूमिका राजकीय नेत्यांची आहे. म्हणून राजकारणामधील नैतिकता उंचविल्या गेली तर योग्य व्यक्तींना निवडणूकीत उभे करतील आणि भ्रष्ट व्यक्तींना तिकीटे देणार नाही तेव्हाच भ्रष्टाचार निर्मूलनाचा मार्ग सुकर होईल.

(3) **शासनाच्या कृतीमध्ये सुधार :** प्रशासनामधील भ्रष्टाचाराचे समूळ नष्ट करायचे असेल तर शासन स्तरावर कार्यात्मक कृतीमध्ये सुधारणा करावी लागेल. सामान्य लोकांच्या आणि इतर कार्यासंबंधी फाईलींचा निपटारा लावण्याची सीमा असावी आणि अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या वेतनात वाढ करून लाचखोर

Scanned with CamScanner

पैशाची अफरातफर इत्यादी बेकायदेशीर पैलूंवर सक्तीचे नियंत्रण असावे, कार्यालयातील कर्मचाऱ्यांविरुद्ध नियमबाह्य वर्तनाबद्दल तक्रारी असतील तर संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरूद्ध कारवाई करावी तेव्हाच भ्रष्टाचाराचे व्यापक स्वरूप नष्ट करण्याला मदत मिळेल.

(4) **न्यायालयीन सुधार :** न्यायालयाच्या दिरंगाईमुळे भ्रष्ट आचारणाच्या केसेस प्रलंबित आहेत. यामुळे भ्रष्टाचार कमी होण्याऐवजी वाढत आहे. म्हणून न्यायालयीन क्षेत्रात व्यापक स्तरावर सुधारणा करणे गरजेचे आहे. अल्प उत्पन्न धारकांना रिश्वतखोरांविरूद्ध तक्रार किंवा न्यायालयात न्याय मागताना पैशाचा विचार करावा लागतो. त्यामुळे कमीत कमी पैशामध्ये न्याय मिळेल अशी व्यवस्था न्यायालयाच्या सुधारणेतून व्हायला पाहिजे. तारीख पे तारीख अशी स्थिती विविध भ्रष्टाचाराच्या केसेसमध्ये होत आहे. अशा केसेसचा कमी वेळात न्याय्य लावण्याची व्यवस्था न्याय व्यवस्थेने करावी. न्यायप्रक्रियेमधील भ्रष्टाचारी व उच्च पदस्थ लोकांवर कठोर कारवाई केली पाहिजे. अशा न्यायालयीन प्रक्रियेमधील सुधारणात्मक उपायांमुळे भ्रष्टाचार कमी करता येतो.

(5) **पोलीस यंत्रणेमध्ये सुधार :** सर्वात भ्रष्ट पोलीस यंत्रणा आहे. म्हणून पोलीस यंत्रणेमधील सुधारणा अतिशय गरजेची आहे. सुशिक्षित लोकांची कुठल्याही सवलतीविना सरळ भरती व्हायला पाहिजे. उच्च पदस्थ पोलीस अधिकाऱ्यांना नैतिकतेची वेळोवेळी जाणीव करून द्यावी, त्याच्या कामाचा ताण कमी करावा आणि पोलिसांना त्यांच्या निष्कलंक सेवेची जाणीव करून देणारे शिक्षण मिळायला पाहिजे. पोलिसांच्या वेतनात वाढ करून भ्रष्ट पोलिसांविरूद्ध आलेल्या तक्रारीची सहनिशा करून पोलीस आयुक्तांनी कडक कारवाई करावी. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पोलिसांवर किंवा पोलीस अधिकाऱ्यांवर राजकीय नेत्यांचे दबावतंत्र नाहीसे झाले पाहिजे, अशा पोलीस यंत्रणेमधील सुधारणांमधून भ्रष्टाचारावर नियंत्रण घालणे शक्य होईल.

(6) **भ्रष्टाचार विरोध संघटनांमधील समन्वय :** भ्रष्टाचार विरोधात लढणाऱ्या अनेक संघटना आहेत. परंतु त्या संघटना त्या त्या राज्य स्तरावर आंदोलने करताना आढळतात ज्यामुळे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन व्यापक स्तरावर होत नाही म्हणून भ्रष्टाचार विरोधी आंदोलनातील संघटनांमध्ये समन्वय साधला जावा. जेणे करून भ्रष्टाचार विरोधात मोठमोठी आंदोलने होतील, एक व्यापक लढा उभारता येईल. या लढ्यामध्ये सामान्य जनतेने सुद्धा सहभागी व्हावे. प्रत्येक गाव स्तरावर कार्यकर्त्यांचे ग्रुप तयार करावे आणि कुठल्याही राजकीय नेत्यांच्या दबावात न येता भ्रष्टाचार विरोधात चहुबाजूने आंदोलन उभे करावे. तेव्हाच भ्रष्टाचाराचा डायनोसार मारता येईल.

(7) **भ्रष्टाचार करणाऱ्याला कडक शिक्षा :** भ्रष्टाचार करणारी कितीही मोठी व्यक्ती आणि उच्च पदावर असेल तरी त्याला कठोरातील कठोर शिक्षा व्हायला

Scanned with CamScanner

पाहिजे. ज्यामुळे इतर लोकांवर शिक्षेचा दरारा निर्माण होईल. व्हाईट कॉलर गुन्ह्यासंदर्भात विशेष कायद्याची सक्त गरज आहे. विशेष कायद्यांमुळे मोठ्या स्तरावर होणारा भ्रष्टाचार नियंत्रणात आणता येईल. केवळ भ्रष्ट कर्मचाऱ्यांची बदली करून भ्रष्ट आचारणावर नियंत्रण साधता येत नाही, तर भ्रष्टाचारी व्यक्तीवरील कठोर कारवाईमुळे भ्रष्टाचार निर्मूलन करता येते.

(8) **उद्योग व्यापारसंबंधी कायद्याची कठोरता लागू करणे** : भ्रष्टाचारासंबंधी अनेक कायदे आहेत. विशेष करून उद्योग–व्यापार संबंधी जे कायदे आहेत त्यांची कठोरपणे अंमलबजावणी करावी. कायदे लागू करणारी यंत्रणा यामधील लाचखोरी कमी करून कायद्यामध्ये कठोरता कशी येईल याचा विचार करून त्याची कडक अंमलबजावणी करणे अगत्याचे आहे. कारण उद्योग–व्यापार क्षेत्रात कमालीचा भ्रष्टाचार आहे. म्हणून त्याचा बिमोड करण्याकरिता कायद्याची कठोरता लागू करणे काळाची गरज बनली आहे. तेव्हाच भ्रष्टाचारावर नियंत्रण आणता येते.

अशाप्रकारे भ्रष्टाचाराची समस्या सुटण्याकरिता भ्रष्टाचार थांबविण्याच्या हेतूने उपाय आहेत. या प्रत्येक उपायाची कमी–अधिक प्रमाणात गरज आहे. याशिवाय शिक्षणाची गुणवत्ता सुधारणे, नैतिक मूल्यांचे शिक्षण, भ्रष्टाचाराबद्दल जनजागृती इत्यादी अनेक उपायांमधून भ्रष्टाचार थांबविणे शक्य होण्याचा मार्ग खुला होईल त्यातूनच सामान्य लोकांच्या समस्या कमी करता येईल.

●●●

Scanned with CamScanner